# प्रसिध्दी पत्रक

दिनांक 23/07/2026

**आरोपी इतर लोकसेवक** :- अजय रोकडे, डाटा ऑपरेटर (कंत्राटी इ.लो.से.),नेमणुक-मुख्य पशुसंवर्धन अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांचेकडुन 6500/- रुपये फोनपे व्दारे लाच स्विकारल्याने आरोपी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे क्रांतीचौक, छत्रपती संभाजीनगर शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | श्री.अजय भगवान रोकडे, पद-डाटा ऑपरेटर, (कंत्राटी इ.लो.से.), नेमणुक-मुख्य पशुसंवर्धन अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागणी रक्कम | 6500/- रुपये |
| लाच स्विकृती रक्कम | 6500/- रुपये फोन पे व्दारे स्विकारले. |
| सापळा अधिकारी<br>तपास अधिकारी | श्री.वाल्मीक कोरे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर.<br>श्री.संतोष तिगोटे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांच्या चुलतभावाचे मटण दुकानाचा परवाना काढून देण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | तक्रारदाराच्या चुलत भावाचे मटण विक्री दुकानाचा नविन परवाना मिळण्याकरीता अर्ज केला होता. त्याकामासाठी भावाचे वतीने तक्रारदार हे आरोपीला भेटले असता आरोपीने एकूण 6500/ रुपये लाचेची मागणी केली होती. त्यापैकी 1000/- रुपये रक्कम यापूर्वी फोन-पे द्वारे स्विकारली होती. उर्वरित रक्कम देण्याची तक्रारदाराची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे तक्रार दिली.<br>तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २१/०७/२०२६ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी मध्ये इलोसे यांनी तक्रारदार यांचे चुलत भावाचे मटन शॉपचा नविन परवाना काढून देण्यासाठी ६५००/-रुपयांची लाचमागणी केल्याचे निष्पन्न झाले व सदर वेळी इलोसे यांनी तक्रारदार यांचे कडुन फोन पे व्दारे ५००/- रुपये लाच रक्कम स्विकारली.<br>दिनांक २२/०७/२०२६ रोजी सापळा कारवाई दरम्यान इलोसे यांनी तक्रारदार यांचे कडुन उर्वरित लाचेची रक्कम ५०००/- रु. फोन-पे वर स्विकारली. त्यानंतर इ.लो.से. यांना दिनांक २३/०७/२०२६ रोजी ताब्यात घेण्यात आले.<br>आरोपी इ.लो.से. यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन क्रांतीचौक, छत्रपती संभाजीनगर शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे, अपर पोलीस अधीक्षक श्री.शशिकांत सिंगारे, पोलीस उप अधीक्षक श्री प्रशांत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक, श्री. वाल्मिक कोरे यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पो.ह./ राजेंद्र जोशी, पो.अंम.प्रकाश डोंगरदिवे, चा.पो.अंम.चांगदेव बागुल, ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगर यांनी मदत केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर

ई- मेल :-1)spacbaurangabad@mahapolice.gov.in 2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 90110 92777 अपर पोलीस अधीक्षक :- 9923102205

पोलीस उप अधीक्षक :- 9870145915 व्हॉट्सअप क्रमांक :- 7720891064

(प्रशांत पवार)
पोलीस उप अधीक्षक,
ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर.

पोलीस उप अधीक्षक कार्यालय, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर
सत्यमेव जयते